निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
गुरुवार
२६ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १६ वे अंक: २० वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## थोडक्यात

### ९९ हजारांचे दागिने चोरी

**उमरखेड :** येथील नाथनगरात चोरट्यांनी घरफोडी करून ९८ हजार २०० रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना घडली. गोविंद विठ्ठलराव फड असे फिर्यादीचे नाव आहे. ते बाहेरगावी गेले असता चोरट्यांनी दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील सोन्या व चांदीचे दागिने लंपास केले. याप्रकरणी उमरखेड पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### जवळा येथून दुचाकी लंपास

**आर्णी :** तालुक्यातील जवळा शेतशिवारातून अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची घटना उघडकीस आली. पंकज प्रकाश राठोड रा. खोपडी खु., ता. दारव्हा असे फिर्यादीचे नाव आहे. त्यांनी एमएच २९ सीपी १४१६ क्रमांकाची ३५ हजारांची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची तक्रार आर्णी पोलिस ठाण्यात दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### पुसदमध्ये ८७ हजारांची चोरी

**पुसद :** येथील माहुर रोडवरील पृथ्वीराजनगरात ८७ हजारांची घरफोडी झाल्याची घटना उघडकीस आली. दिनेश शंकर राठोड असे फिर्यादीचे नाव आहे. अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचा कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. रोख ३० हजार, ५४ हजारांचे दागिने, तीन हजारांची मशीन असा मुद्देमाल चोरी केल्याची तक्रार पुसद शहर पोलिस ठाण्यात दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपीवर गुन्हा नोंद केला.

### ट्रॉलीखाली दबून एकाचा मृत्यू

यवतमाळ : ट्रॅक्टर दुरुस्तीचे काम करताना ट्रॉलीखाली दबून एकाचा मृत्यू झाल्याची घटना येथील गोधणी रोडवरील शाळेजवळ बुधवारी दुपारी १२:४५ वाजेच्या सुमारास घडली. किशोर उत्तमराव शेंडे (४५, रा. जुना उमरसरा) असे मृताचे नाव आहे. ट्रॅक्टर पंक्चर झाल्याने किशोर जॅक लावून दुरुस्ती करीत होते. याच वेळी ही घटना घडली. मृताची पत्नी अर्चना शेंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अवधूतवाडी पोलिसांनी नोंद घेतली आहे.

# असली नोटांच्या मोबदला, चारपट नकली नोटा..!

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**पुसद :** वसंतनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विजय टॉकीज रस्त्यावर सुमारे तीन वर्षांपूर्वी चायनीजचा पदार्थांचा ठेला चालविणाऱ्यावर पोलिस कर्मचाऱ्याच्या मदतीने दरोडा टाकला होता. त्या दरोडाप्रकरणी एकजण फरार झाला होता. तो फरार आरोपी तीन वर्षांनंतर पोलिसांच्या जाळ्यात अडकला. त्याला सोमवार, 23 मार्च रोजी पोलिसांनी अटक केली.

ही घटना 25 जानेवारी 2023 च्या संध्याकाळी 6.30 च्या दरम्यान घडली होती. पोलिसासोबत संगनमत करून हा दरोडा टाकल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मारेगाव तालुक्यात कोसारा येथे राहणारा संगपाल उर्फ संगम विजय गाणार (वय 40) असे अटक केलेल्या फरार आरोपीचे नाव आहे.

संघपालने पोलिस कर्मचारी युवराज जाधव याच्यासह इतर दोघांच्या मदतीने वसंतनगर पोलिस ठाणे हद्दीत हा दरोडा टाकला होता. उपविभागीय पोलिस अधिकारी पथकाकडून मिळालेल्या माहितीनुसार नागपूर येथील तकिया धंतोली पटवर्धन ग्राऊंड इंडियन जिमखाना येथे राहणारे संदीप प्यारेलाल गुप्ता (वय 37) यांनी चार अज्ञातांविरोधात वसंतनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती.

संदीप चायनीजचा ठेला लावत होता. त्याच्याकडे पंधरा दिवसांपासून दरोड्यातील एक जण चायनीज पदार्थ खाण्याकरिता येत होता. त्यामुळे त्या दोघांची ओळख झाली होती. त्याने संदीपला असली 500 व 100 रुपयांच्या नोटांच्या मोबदल्यात चार पट नकली नोटा देतो असे आमिष दाखविले होते.

जुन्या दरोड्यातील एकजण दहा-बारा दिवसांपूर्वी राजा नावाच्या व्यक्तीला संदीपच्या ठेल्यावर घेऊन आला होता. त्याला नागपूरच्या कॉटन मार्केटमधील जुन्या लॉजवर घेऊन गेला. तिथे दरोडेखोरांनी त्याच्यासमोर 500 रुपयांच्या दोन नकली नोटा व एक शंभरची नकली नोट असे 1,100 रुपये काढून दिले होते. त्यानंतर तो तिथून निघून गेला. जाताना राजा नावाच्या व्यक्तीने त्याचा नंबरसुद्धा दिला होता. 'ओरिजनल' 4 लाख रुपयांच्या बदल्यात नकली 16 लाख रुपये देतो असे पंधरा दिवसांपूर्वी दरोडेखोरांनी सांगितले होते.

त्यानंतर संदीपने पवनला भय्या भाजीवालेंकडून 1 लाख, नातेवाईक व मित्रांकडून 3 लाख असे 4 लाख रुपये जमा केले होते. त्यानंतर राजासोबत संपर्क केल्यावर संध्याकाळी चार लोकांनी 16 लाख रुपयांच्या नकली नोटा देण्याचे आमिष दाखवून विजय टॉकीज रोडवर बोलावले.

त्यावेळी नकली नोटा संदीपला दाखवून त्या मोबदल्यात चार-साडेचार लाख खऱ्या नोटा त्याच्याजवळून घेऊन पसार झाले होते. दरोडा प्रकरणी अज्ञातांवर वसंतनगर पोलिसांनी 26 जानेवारी 2023 च्या रात्री गुन्हे दाखल केले होते.

तेव्हापासून संगपाल गाणार पोलिसांची नजर चुकविण्यासाठी वेगवेगळ्या जिल्ह्यात राहत होता. त्याचा ठावाठिकाण निश्चित मिळत नव्हता. त्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने अतिशय शिताफीने फरार आरोपी संगपाल गाणार नागपूरला असल्याची माहिती पथकाने मिळवली होती.

या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकातील उपनिरीक्षक रवी चव्हाण, पंकज पातुरकर, सुनील मदणे यांनी नागपूर येथे जाऊन संगपाल गाणारला अटक करण्यात यश मिळविले आहे.

# यवतमाळात जिल्हा कृषी महोत्सव

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**यवतमाळ :** दरवर्षीप्रमाणे आत्मा व कृषी विभागामार्फत आयोजित जिल्हा कृषी महोत्सव व प्रदर्शनाचे शुक्रवार, 27 ते 31 मार्च दरम्यान कृषी विज्ञान केंद्र वाघापूर येथे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी बुधवार, 25 मार्च रोजी झालेल्या पत्रपरिषदेत दिली.

पुढे बोलताना मीना म्हणाले, हा महोत्सव कृषी विभागासोबतच पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ, उमेद (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), जिल्हा माहिती अधिकारी, ग्रंथालय विभाग आणि नगर परिषद यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे.

कृषी विभाग 200 स्टॉल्स उभारणार आहे. यात 40 शासकीय दालने, 30 स्टॉल्स कृषी निविष्ठा, 30 स्टॉल्स कृषी तंत्रज्ञान व सिंचन, 40 स्टॉल्स गृहोपयोगी वस्तू, 20 स्टॉल्स धान्य महोत्सव आणि 20 स्टॉल्स खाद्य पदार्थांसाठी राहणार आहेत.

याकरिता एकूण 8 डोम उभारायचे असून, कृषी विभागाने एकूण 6 डोमची उभारणी सुरू केली आहे. डोम क्रमांक दोनमध्ये शासकीय दालने, 3 मध्ये सेमिनार हॉल, 4 मध्ये कृषी निविष्ठा, 5 मध्ये फुड झोन, खाद्यपदार्थ, 6 मध्ये गृहोपयोगी वस्तू, 7 मध्ये माविम बचतगट व सेंद्रीय शेती, धान्य विक्री उर्वरित दोन डोमपैकी एक पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग आणि एक उमेद यांचे राहणार असल्याचे जिल्हाधिका-यांनी सांगितले.

# शेती क्षेत्रावरील युध्दाच्या परिणामांची निती स्पष्ट करा

## शेतकरी नेते सिकंदर शहा यांची मागणी

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**यवतमाळ :** भारतात खरीप हंगाम लवकरच सुरु होणार असून युध्दामुळे खताची प्रचंड टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. भारतातील खरीप हा सर्वात मोठा हंगाम असल्यामुळे शेतकरी कोट्यवधी रुपये आपल्या शेतीत गुंतवणार आहे. दरम्यान युध्दजन्य परिस्थितीमुळे देशातील शेतीवर संकट येण्याची शक्यता असून केन्द्र सरकारने शेती क्षेत्रावरील युध्दाच्या परिणामांची निती स्पष्ट करण्याची मागणी शेतकरी नेते सिकंदर शहा यांनी व्यक्त केली आहे.

सिकंदर शहा यांनी म्हटले आहे की, मध्यपूर्वेतील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. त्याचा थेट परिणाम डिझेल-पेट्रोलच्या उपलब्धतेवर आणि दरांवर



होण्याची शक्यता आहे. शेतीतील नांगरणी, वखरणी आणि पेरणीसाठी डिझेल अत्यावश्यक असल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण होऊ शकतात. याशिवाय खतांच्या संभाव्य तुटवड्याबाबतही त्यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. वास्तव पाहता, भारतात वापरल्या जाणाऱ्या अनेक रासायनिक खतांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर आयात केलेल्या कच्च्या मालावर अवलंबून आहे. विशेषतः सल्फर (गंधक) हा घटक महत्त्वाचा असून तो प्रामुख्याने कच्च्या तेलाच्या शुद्धीकरणातून किंवा नैसर्गिक वायूपासून मिळतो. भारत मोठ्या प्रमाणावर सल्फर आणि फॉस्फेटिक कच्चा माल मध्यपूर्व देशांकडून आयात करतो. सल्फरचा वापर सिंगल सुपर फॉस्फेट (SSP) आणि इतर फॉस्फेटिक खतांच्या निर्मितीत होतो. सल्फरचा पुरवठा खंडित झाला किंवा महागला, तर खत उत्पादनावर थेट परिणाम होतो. याचप्रमाणे युरिया निर्मितीसाठी नैसर्गिक वायू आवश्यक असतो, तो देखील मोठ्या प्रमाणावर आयात केला जातो. युध्दामुळे शेतीवर गंभीर संकट येणार असल्याने केन्द्र सरकारने आपली निती स्पष्ट करीत शेतक-यांना दिलासा देण्याची मागणी सिकंदर शहा यांनी व्यक्त केली आहे.

### स्पष्ट भूमिका जाहिर करा

■ खरीप हंगामात वेळेवर खते मिळाली नाहीत तर उत्पादन घटण्याबरोबरच शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने पुढाकार घेत खतांचा साठा, आयात नियोजन आणि वितरण व्यवस्था याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करून शेतकऱ्यांना आश्वस्त करावे, अशी मागणी सिकंदर शहा यांनी केली आहे.

# "महावीर पाणपोई" उपक्रमाचे भव्य उद्घाटन

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**यवतमाळ :** भगवान महावीर जन्मकल्याणकाच्या पावन निमित्ताने महावीर युवक मंडळ व जोश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ येथील पोस्ट ऑफिस परिसरात "महावीर पाणपोई" या सेवाभावी प्रकल्पाचे उत्साहात आणि मोठ्या जल्लोषात उद्घाटन करण्यात आले.




या सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी जैन समाजाचे आधारस्तंभ आदरणीय किशोरजी दर्डा तसेच यवतमाळचे लोकप्रिय आमदार मा. श्री बाळासाहेब मांगुळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी भारतीय जैन संघटना, यवतमाळचे अध्यक्ष उमेश बैद, सचिव संदीप कोचर, युवकांचे प्रेरणास्थान शामभाऊ भन्साली, जैन सेवा समितीचे अध्यक्ष महावीर भंसाली, उपाध्यक्ष विजय कोटेचा, तसेच कस्तुर सेठिया यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान किशोरजी दर्डा, आ. बाळासाहेब मांगुळकर, सौ. सीमाजी दर्डा (लोकमत सखी मंच), महावीरजी भंसाली, उमेशजी बैद, वनिताजी भरूट, सौ. शारदाजी गांधी, शामभाऊ भन्साली आणि महावीर जन्मकल्याणक 2026 चे प्रकल्प अधिकारी दीपकजी बोरा यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी जैन समाजातील ज्येष्ठ सदस्य अमरचंदजी गुगलिया यांनी मनोगत व्यक्त करताना "पाणी देणे हे नऊ प्रकारच्या पुण्यांपैकी एक महत्त्वाचे पुण्य आहे" असे सांगत या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. किशोरजी दर्डा यांनीही कौतुक केले. कार्यक्रमास चंदा खबिया, प्रियंका तातेड, पूजा

### समाजसेवेचा प्रेरणादायी आदर्श

गुगलिया, वंदना बोरुंदिया, वनिता भरूट, शारदा गांधी, हर्षिता कुचेरिया यांच्यासह अनेक महिलांनी सहभाग नोंदविला. तसेच विजय कुमार बुंदेला, कस्तुर सेठिया, संतोष गादीया, राजेंद्र गुगलिया, राजेंद्र गेलडा, प्रशांत दर्डा, संजय गुगलिया, रमेश खीवसरा, गिरीशभाई खंडेडिया, सुमती कोठारी, दर्शन खीवसरा, नितीन खीवसरा यांच्यासह जैन समाजातील अनेक गणमान्य व्यक्ती उपस्थित होत्या.

महावीर युवक मंडळ व जोश फाऊंडेशनचे अध्यक्ष समर्पण गांधी यांच्या नेतृत्वाखाली शुभम खीवसरा, जयेश बोरा, दीपक बोरा, पियूष तातेड, अंशुल तातेड, ईशान बोथरा, सक्षम खीवसरा, नवीन कोठारी, डॉ. आनंद भंडारी, अनीश भंडारी, आशीष देसाई, यश भरूट, हर्ष भरूट, ॲड. सुनय ओस्तवाल, कुणाल पोकरणा, तिलकराज गुगलिया, वैभव लोढा, सम्यक सुराणा, विजय भिसे आदी कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# ट्रॅक्टरखाली पिके, पैनगंगेतून रेतीची लूट!

## हातला परिसरात अवैध उत्खनन; विरोध करणाऱ्यांना दमदाटी

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**बाबा खान लाला**

**उमरखेड :** शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार तालुक्यातील सर्व सातही रेतीघाट बंद असतानाही, दिवटपिंपरी व नांदला रेतीघाटांच्या मधोमध येणाऱ्या हातला गावलगत पैनगंगा नदी काठावर मोठ्या प्रमाणात अवैध रेती चोरी सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.




स्थानिकांच्या माहितीनुसार, रात्रीच्या अंधारात ट्रॅक्टरच्या साहाय्याने नदीपात्रातून रेतीचा मोठ्या प्रमाणावर उपसा केला जात आहे. या बेकायदेशीर कारवायांमुळे नदीकाठावरील शेतजमिनींचे मोठे नुकसान होत असून, उभ्या पिकांवर ट्रॅक्टरचे टायर फिरल्याने शेतकरी आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत आहेत.

प्रशासन शेतकरी या प्रकाराला विरोध करताच त्यांना उघडपणे धमक्या दिल्या जात असल्याचेही समोर आले आहे. "काही बोललात तर भानगडीत अडकवू," अशा प्रकारची दादागिरी वाढत चालली आहे. त्यामुळे अनेक शेतकरी नाव न सांगण्याच्या अटीवरच आपली व्यथा मांडत आहेत.

परिसरात अशीही चर्चा रंगली आहे की, या अवैध रेती उपशाला काही महसूल कर्मचाऱ्यांचे छुपे संरक्षण मिळत आहे. एका कर्मचाऱ्याचा थेट माफियांशी संबंध असल्याचा आरोपही स्थानिकांनी नाव न घेता केला आहे. "प्रशासनाच्या मदतीशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात वाळू चोरी शक्यच नाही," असे संतप्त शेतकरी सांगतात.

दरवर्षी अशाच प्रकारे रेती चोरी सुरू राहते, मात्र ठोस कारवाई होत नसल्याने चोरट्यांची दादागिरी वाढतच आहे. यंदा तर माध्यमांनाही दमदाटीच्या घटना घडल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

अवैध रेती उपशामुळे नदीचे नैसर्गिक संतुलन बिघडत असून, भविष्यात पूरस्थिती व जलसंकटाचा धोका वाढण्याची शक्यता आहे. पर्यावरणप्रेमींनी याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

या सर्व प्रकाराकडे उपविभागीय अधिकारी यांनी तात्काळ लक्ष घालून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

# जागतिक युद्धाच्या 'झळ' पोहचली 'चुली'पर्यंत

## टंचाईचा मोठा फटका हॉटेल व्यावसायिकांवर पुन्हा 'काळा धूर' सोसण्याची वेळ



■ आम्ही कित्येक वर्षांपासून गॅसवरच हॉटेल चालवत आहोत. पण आता आठवडा झाला तरी गॅस सिलेंडर मिळत नाहीये. ग्राहक हॉटेलमध्ये येतात, त्यांना रिकाम्या हाती पाठवू शकत नाही. म्हणून शेवटी लाकडे गोळा करून चूल पेटवली आहे. युद्ध तिकडे चाललंय, पण त्याची झळ आम्हा गरिबांना सोसावी लागत आहे."
**कुणाल चरण राठोड,**
**स्थानिक हॉटेल व्यावसायिक, फुलसावंगी.**

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**फुलसावंगी :** दोन देशांमधील युद्धाचा परिणाम केवळ सीमेपुरता मर्यादित न राहता तो आता फुलसावंगी सारख्या ग्रामीण भागातील सर्व सामान्यांच्या पोटा पर्यंत पोहोचला आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या विस्कळीत पुरवठा साखळीमुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, येथील हॉटेल व्यावसायिकांना गॅसअभावी पुन्हा 'चूल' पेटवण्याची वेळ आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून महागाव आणि फुलसावंगी परिसरात व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. सिलिंडरसाठी आगाऊ नोंदणी करूनही वेळेवर पुरवठा होत नसल्याने हॉटेल चालकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. गॅस शेगडीची जागा आता पुन्हा मातीच्या चुलीने घेतली असून, भर उन्हात धुराच्या लोटात काम करावे लागत असल्याने कारागिरांचे आरोग्यही धोक्यात आले आहे.

हॉटेल व्यावसायिकांचे आर्थिक गणित कोलमडले गॅस मिळत नसल्याने हॉटेल व्यावसायिकांना नाईलाजास्तव लाकूड फाटा, सरपण विकत घ्यावे लागत आहे. मात्र, मागणी वाढल्याने लाकडाचे भावही कडाडले आहेत. यामुळे एका बाजूला ग्राहकांना वेळेवर सेवा देणे कठीण होत आहे, तर दुसरीकडे खर्चात वाढ झाल्याने नफा घटला आहे. चुलीवर पदार्थ तयार होण्यास गॅसच्या तुलनेत दुप्पट वेळ लागतो. चुलीच्या धुरामुळे हॉटेलच्या भिंती आणि भांडी काळी पडत असून स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. धुराच्या त्रासामुळे मजूर काम सोडून जात आहेत.

ग्रामीण भागातील या छोट्या व्यावसायिकांची रोजीरोटी पूर्णपणे या व्यवसायावर अवलंबून आहे. गॅसचा पुरवठा सुरळीत न झाल्यास अनेक हॉटेल बंद पडण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रशासनाने याकडे लक्ष देऊन गॅस पुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी फुलसावंगीतील व्यावसायिकांनी केली आहे.

# "इंधनासाठी धावपळ शेतमालासाठी उपेक्षा!"

## उमरखेड तालुक्यात शेतकऱ्यांचा संताप; शासनाच्या धोरणांवर थेट प्रश्नचिन्ह

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**बाबा खान लाला**

**उमरखेड :** जागतिक युद्धजन्य चर्चांमुळे गॅस, पेट्रोल आणि डिझेल टंचाईच्या भीतीने बाजारपेठेत अस्वस्थता निर्माण झाली आहे. शहरासह ग्रामीण भागात पेट्रोल पंपांवर नागरिकांच्या लांबलचक रांगा लागल्या असून, काही ठिकाणी इंधनासोबत इतर वस्तूंची सक्तीने विक्री होत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

मात्र या परिस्थितीत उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांनी शासनाच्या धोरणांवर थेट प्रश्न उपस्थित केला आहे

"इंधनासाठी एवढी तातडी, मग अन्नधान्यासाठी का नाही?" गेल्या वीस वर्षांपासून गहू, सोयाबीन आणि कापूस या पिकांचे दर अपेक्षित प्रमाणात वाढले नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. खत, बियाणे, औषधे, मजुरी यांचा खर्च सातत्याने वाढत असताना, शेतमालाला मिळणारा भाव मात्र स्थिर असल्याने शेतकऱ्यांच्या हातात नफा राहत नाही.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, "इंधन टंचाईच्या बातम्या येताच लोक रांगा लावून खरेदी करतात,



पण आमच्या धान्याला ना योग्य भाव मिळतो, ना तशी मागणी निर्माण होते. आमचा मालही सन्मानाने आणि योग्य दरात विकला गेला पाहिजे."

तज्ज्ञांच्या मते, इंधन बाजार आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर अवलंबून असल्याने त्यात चढ-उतार होणे स्वाभाविक आहे. मात्र अन्नधान्याच्या बाबतीत देशांतर्गत ठोस धोरणे राबवून शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक आहे.दरम्यान, शेतकऱ्यांकडून शासनाकडे मागणी होत आहे की, शेतमालाला हमीभाव प्रभावीपणे लागू करावा बाजारपेठेत स्थिर दराची हमी द्यावी दलालांची साखळी कमी करून थेट खरेदी व्यवस्था मजबूत करावी अन्यथा, "इंधनासाठी रांगा आणि शेतमालासाठी उपेक्षा" हा विरोधाभास अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. "देशाला इंधन जितकं गरजेचं, तितकंच अन्नही... मग शेतकऱ्यांना न्याय कधी?"

# शेती कर्जमाफीचे दुष्टचक्र

महाराष्ट्र सरकारने शेतकरी बांधवांसाठी नवीन कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. ३० लाख शेतकऱ्यांचे प्रत्येकी दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करून देणारी ही ताजी योजना आणि यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा आढावा २०२६-२७च्या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसाठी नवीन कर्जमाफी योजना जाहीर केली. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज संपूर्णपणे माफ होईल. या योजनेचा लाभ साधारण ३० लाख शेतकऱ्यांना होऊ शकेल. या ३० लाखांपैकी साधारण २० लाख शेतकरी नियमितपणे कर्जफेड करणारे, तर साधारण १० लाख शेतकरी थकबाकीदार आहेत.

या योजनेमध्ये सरकारने साधारण ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. इतका मोठा खर्च असूनसुद्धा सरकारची वित्तीय परिस्थिती मजबूत असल्यामुळे सरकारी खजिन्यावर फारसा ताण येणार नाही आणि शेतकरी बांधवांचे हितरक्षण करण्यासाठी सरकार तो ताण सहज सहन करेल. काळजी करण्याचे कारण नाही, असा सरकारचा विश्वास आहे. या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने गेल्या दहा वर्षांमध्ये जाहीर केलेल्या एकूण कर्जमाफी योजनांचा एकत्र आढावा घेणे सयुक्तिक ठरेल.

'शेतकरी' या शब्दाची सरकारी किंवा कायदेशीर व्याख्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये एकच आणि एकजिनसी नाही. तथापि या लेखामध्ये आपण सरकारी व्याख्या थोडी बाजूस ठेवून अर्थशास्त्रीय व्याख्या स्वीकारणार आहोत. कारण अनेक अर्थशास्त्रीय अभ्यास, सर्वेक्षण यामधून अर्थशास्त्रीय व्याख्या स्वीकारलेली असते. त्याप्रमाणे 'ज्या व्यक्तीच्या एकूण उत्पन्नापैकी निदान पन्नास टक्के उत्पन्न शेतीतून मिळालेले असेल अशा व्यक्तीलाच शेतकरी म्हणावे.'

सन २०२६-२७ची कर्जमाफी योजना जमेस धरून २०१७ ते २०२६ या काळात एकूण पाच कर्जमाफी योजना जाहीर झाल्या आहेत. गेल्या दहा वर्षांतील विविध कर्जमाफी योजनांची वारंवारिता आणि त्यामध्ये खर्च झालेली एकूण रक्कम याचा विचार केला तर महाराष्ट्र राज्य सातत्याने पहिल्या तीन-चार राज्यांमध्ये राहिले आहे. (इतर राज्ये कर्नाटक, तेलंगण, उत्तर प्रदेश) वारंवारितेबाबत मात्र महाराष्ट्राचा गेल्या दहा वर्षांमध्ये सातत्याने पहिला क्रमांक आहे. राज्यामध्ये २०१७ मध्ये दोन, २०१९ मध्ये दोन आणि आता २०२६ मध्ये एक अशा कर्जमाफी योजना झाल्या आहेत. या योजनासाठी खर्च झालेल्या एकूण रकमेमध्येसुद्धा महाराष्ट्र आघाडीवर आहे.

उपलब्ध आकडेवारीप्रमाणे २०१७ मध्ये ३४,००० कोटी, २०१९ मध्ये २२,००० कोटी आणि आता पुन्हा प्रस्तावित योजनेसाठी ३५,००० कोटी अशी एकूण रक्कम खर्च झाली आहे किंवा २०२६-२७ मध्ये व्हावयाची आहे. ही एकूण बेरीज ९१,००० कोटी होते. मात्र यामध्ये अत्यंत समाधानाची गोष्ट अशी की अंमलबजावणीचे प्रमाण मात्र इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रामध्ये अतिशय समाधानकारक राहिलेले आहे. सर्व योजनांचा एकत्रित विचार करता अंमलबजावणीचे प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा जास्त राहिले आहे. यामध्ये कोणत्या शेतकऱ्याला दरडोई किती मिळाले असावेत, ही सरकारी आकडेवारी उपलब्ध होत नाही. आपणच थोडी (कंटाळवाणी) आकडेमोड करू. सरकारी मदत बहुतेक वेळा लहान शेतकऱ्यांना दिली जाते. (ज्याचे कसणुकीचे क्षेत्र पाच एकरपेक्षा कमी आहे.) २०२१च्या शेतीच्या शिरगणतीप्रमाणे महाराष्ट्रामध्ये लहान शेतकरी एकूण १ कोटी ७० लाख इतके असून एकूण शेतकऱ्यांमध्ये लहान शेतकऱ्यांचे प्रमाण साधारण ८५ टक्के आहे.

९१ हजार कोटी या संख्येला १ कोटी ७० लाख या संख्येने भागल्यास भागाकार ५३,५२९ येतो. याचा अर्थ सोपा आहे. २०१७ ते २०२७ या दहा वर्षांमध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक लहान शेतकऱ्याला कर्जफेडीसाठी सरकारकडून साधारण ५३,००० रुपये मिळाले. दर वर्षी निदान पाच हजार रुपये! याबाबतीत तरी महाराष्ट्रातील लहान शेतकरी इतर राज्यांतील लहान शेतकऱ्यापेक्षा भाग्यवान दिसतो. मात्र हे कागदावरील गणित आहे हे विसरू नये.

सरकारच्या कर्जमाफी योजनांसंबंधीच्या माहितीवरून कोणासही असेच वाटेल, की महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमुक्त होण्याच्या मार्गावर आहे. जे अक्षम आहेत त्यांचे कर्ज सरकार फेडते आणि सक्षम आहेत ते स्वत:च कर्जफेड करत आहेत. एकूण परिस्थिती समाधानकारक आहे. शेती विकासही समाधानकारक असणार. परंतु दुर्दैवाने तसे मुळीच दिसत नाही. याबाबत सर्वांना विषण्ण करणारी गोष्ट म्हणजे आपल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या. दुर्दैवाने महाराष्ट्र जसा कर्जमाफी योजनांमध्ये आघाडीवर आहे तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येसुद्धा. आपण केवळ आघाडीवरच नाही, तर प्रथम क्रमांकावर आहोत. २०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात ४,१५१ (प्रथम), कर्नाटक २,४२३ (दुसरा). आपण दुसऱ्या नंबराच्या दुप्पट आहोत. (२०२३ मध्ये गुजरात मात्र ५६४ आत्महत्या.) आपल्या राज्यातील बहुतेक शेतकरी आत्महत्या विदर्भातील कापूस उत्पादकांच्या आहेत. कर्जाचे (जड झाले) ओझे हे मुख्य कारण आहे.

दुसरे असे की औद्योगिकीकरण, आर्थिक विकास, परदेशी गुंतवणूक यामध्ये महाराष्ट्र (मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक) अव्वल असला तरी शेती विकासाबाबत तसे म्हणता येत नाही. कारण गेल्या दहा वर्षांत शेती विकासाचा वार्षिक सरासरी दर महाराष्ट्रामध्ये साडेतीन ते साडेचार टक्के एवढाच राहिला आहे. (याच काळात गुजरातमध्ये मात्र शेती विकास दर साधारण सहा टक्के राहिला आहे.) त्याचप्रमाणे उद्योगधंदे प्रगत असूनसुद्धा शेतीवरील कामगारांचे प्रमाण (भाऊगर्दी) लक्षणीयरीत्या कमी करणे आपल्याला जमलेले नाही. आजसुद्धा साधारण ५५ टक्के कामगार शेतीवर अवलंबून आहेत. महाराष्ट्राचा शेती विकास तसा वाईट/कमी नाही. परंतु एका बाजूस विकास आणि दुसऱ्या बाजूस आत्महत्या हा विरोधाभास लक्षात घेतल्यावर जो विकास झाला तो शेतकऱ्यामधील आर्थिक विषमता वाढविणारा झाला असावा, या विचाराला पुष्टी मिळते. त्यामुळे कर्जमाफीमध्ये उदार हस्ते मदत केल्यानंतरसुद्धा कर्जमुक्ती आणि समतापूर्ण शेती विकास साधण्यासाठी त्याचा विशेष उपयोग झाला नसावा. विशेषत: इतर काही राज्यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये एकसुद्धा कर्जमाफी न देता उत्कृष्ट शेती विकास साधला आहे हे लक्षात घेतल्यावर आपले दु:ख अधिकच बोचते. शेतकऱ्याला विशेषतः लहान शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सर्वंकष शेती विकासाची गरज आहे. शेती विकासासाठी शेतीमध्ये भरघोस गुंतवणुकीची गरज आहे. येथेच आपण कमी पडलो आहोत. महाराष्ट्रात शेती विकासासंबंधीची गुंतवणूक विशेषतः सरकारी गुंतवणूक कमी पडते, असे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. उदाहरणार्थ, दीर्घ मुदतीचे सिंचन, वीज निर्माण इ. पायाभूत सोयीसाठी गुंतवणूक करण्याऐवजी महाराष्ट्राने शेतीवरील अनुदाने देणे, कर्जमाफी जाहीर करणे, मोफत वीजपुरवठा इ. अल्प मुदत योजनांवर भर दिला. आजमितीससुद्धा महाराष्ट्राचे सिंचन प्रमाण साधारण १८ ते २० टक्के असून ते गुजरात (४५ टक्के), मध्य प्रदेश (साधारण ४३ टक्के), कर्नाटकपेक्षा(साधारण ३० टक्के) कमी आहे. धरणांची संख्या महाराष्ट्रात देशामध्ये सर्वाधिक असूनसुद्धा महाराष्ट्राची शेती पावसावरच अवलंबून आहे. शेती मागासलेली राहते, शेतकरी अक्षमच राहतो आणि पुन्हा पुन्हा कर्जफेडीच्या योजना येतात. भविष्यात हे सर्व बंद (निदान कमी) करण्यासाठी शेतीमध्ये अधिक गुंतवणूक, पायाभूत सोयी निर्मिती आणि कर्जमाफीऐवजी व्याजमाफी, कर्ज मुदत वाढवणे, शून्य व्याजाने कर्ज देणे इत्यादी उपायांचा विचार करावा, असे सुचविल्यास चुकीचे होणार नाही असे वाटते.

# संपूर्ण सृष्टीच्या कल्याणासाठी प्रभु रामचंद्राचे आदर्श सर्वांनीच अंगीकारले पाहिजे



चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात, या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.महाराष्ट्रात नवीन वर्ष ''गुढीपाडवा'' म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो.याच महीण्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला.म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते.आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती,सन्मान,सभ्यता,संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात.त्यामुळे संपूर्ण हिंदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले.त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते.आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वादानेच.यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.यामागे फक्त प्रभू राचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूराचंद्राचा आशिर्वाद भारतीयांना आहे.त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील. कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे.श्री रामाचा जप आपण जन्मा पासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन,निसर्ग,वन्यप्राणी,मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो.त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते.कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोरमहात्म्याचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.आज जगात भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू राचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की त्याची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण बनलेले आहे.त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर असल्याचे मी समजतो.त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे.भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला,वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला,रूषि-मुनी,साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले,रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूराचंद्राची धुंद गुंजतांना दिसते.तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.आज अयोध्येतील राम मंदिरमुळे ''मन में राम,तन मे राम,घर-घर मे राम'' या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे.आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो.यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे.श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभुश्रीरामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हटल्या जाते.प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे.त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे.कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी, स्वार्थीवृत्तीचे असल्यामुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत व मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवली आहे.या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात मग्न(गुंग)असतात.''मु मे राम बगल में छुरी'' अशा प्रकारची असुरी भावना आजच्या ९५ टक्के राजकीय पुढाऱ्यांत दिसून येते.कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पीवुन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी ''रक्तबीज'' राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते.त्यामुळेच देशात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण,महागडे शिक्षण,शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.मी रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमवीलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे आदर्श दिसून येईल. त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे.राजकीय पुढाऱ्यांनी गरिब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल.जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल. आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत.त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे. तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल.रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदुषणावर व बदलत्या हवामानावर आवर घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल.कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत. जय श्रीराम!

**- रमेश कृष्णराव लांजेवार,**
नागपूर

***

# फॅशन, फेम आणि मॅक्स फॅशनची वीस वर्षे पूर्ण झाल्याचा एकत्र सोहळा; लॅक्मे फॅशन वीकमध्ये कल्की कोचलिन

नाशिक दि.२५ (प्रतिनिधी)- सिद्धांत चतुर्वेदी आणि अलाया एफ यांचा सहभाग दोन दशके, लाखो वॉर्डरोब आणि असंख्य 'स्टाईल मोमेंट्स'नंतर 'मॅक्स'ने केवळ आपला वर्धापनदिन साजरा केला नाही, तर भारतातील सर्वात प्रतिष्ठित रॅम्पपैकी भव्य अश्या फॅशन सोहळ्याचे आयोजन केले. लॅक्मे फॅशन वीकमध्ये आपले स्वागत आहे, ते ही मॅक्सचा अनोख्या अंदाज. दिवे मंदावले. संगीताचा सूर मंद झाला. अगदी त्याच क्षणी रनवे केवळ रनवे राहिला नाही, तर तो एका वेगळ्याच अनुभवात रूपांतरित झाला. एकूण ३५ विविध लूक्सच्या माध्यमातून जे काही सादर झाले, तो फक्त पारंपरिक असा फॅशन शो नव्हता. तर आजचा तरुण भारत प्रत्यक्षात कशा प्रकारे पेहराव करतो याचे जिवंत व स्पंदनशील चित्र होते. नाविन्यपूर्ण, आत्मविश्वासपूर्ण आणि आपल्या मूळ स्वभावाशी तसूभरही तडजोड न करणारी ही शैली होती. तीन अतिशय भिन्न ऊर्जा, पण एक निर्विवाद संदेश. कल्की कोचलिन, सिद्धांत चतुर्वेदी आणि अलाया एफ यांनी रॅम्पला नवी झळाळी दिली. तिघांची ऊर्जा अतिशय भिन्न अश्या होत्या, तरी त्यांच्या सादरीकरणातून एक स्पष्ट आणि निर्विवाद संदेश समोर आला. सिद्धांत चतुर्वेदी अलाया एफ कल्की कोचलिन सिद्धार्थ चतुर्वेदीने जेव्हा रनवेवर पाऊल ठेवले, तेव्हा फॅशन शोची सुरुवात अत्यंत उत्साहवर्धक आणि रोमांचक वातावरणात झाली. अवघ्या काही क्षणातच सिद्धार्थने या फॅशन शोला कला, संस्कृती आणि सादरीकरणाच्या एका अविस्मरणीय क्षणाचे असे रूप दिले. संगीताच्या ठेक्यावर आणि रोषणाईचे रंग बदलत असताना सिद्धार्थने 'मॅक्स अर्बन' विभागासाठी दमदार वातावरण निर्माण केले. त्याने आपल्या खास अशा शैलीदार अदा, उत्स्फूर्तता आणि सहजसुंदर कूल अंदाज मंचावर सादर केला. हा उत्साह पुढे नेत मॅक्स फॅशनच्या 'अर्बन' विभागाच्या सादरीकरणासाठी आलेल्या अलाया एफने रनवेवर आपली वेगळी छाप उमटवली. आत्मविश्वास आणि खेळकर वृत्ती ने परिपूर्णअसलेली अलाया एफ या कलेक्शनच्या धाडसी आणि अभिव्यक्तिशील शैलीचे एक मूर्तिमंत प्रतीक ठरली. अलाया एफचा रॅम्प वॉक अत्यंत चैतन्यमय आणि सहजस्फूर्त होता. हा असा फॅशन क्षण होता, जो आपल्या आठवण करून देतो की आजच्या काळातील स्टाईल म्हणजे केवळ कपडे नव्हेत. तर ती व्यक्तिमत्त्व, नवनवीन प्रयोग आणि कोणत्याही ठिकाणी स्वतःची ओळख निर्माण करण्याची वृत्ती आहे. त्यानंतर सिद्धांत पुन्हा एकदा रनवेवर परतला. यावेळी त्याने 'मॅक्स' ब्रँडची मूळ सौंदर्यशैली सादर केली.अत्यंत उत्साही आणि शहरी वातावरणातून अधिक निवांत व बहुआयामी फॅशन विश्वाकडे वळताना, त्याच्या या दुसऱ्या सादरीकरणातून 'मॅक्स' ब्रँडचा समकालीन आणि दैनंदिन शैलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून आला. ही शैली सहजसुंदर, आत्मविश्वासपूर्ण आणि परिधान करण्यास अत्यंत सोपी आहे. यानंतर रंगमंचावर अवतरला तो भव्य क्षण. शोचा मुख्य भाग असलेल्या आणि 'शोस्टॉपर' ठरलेल्या सादरीकरणात कल्की कोचलिनने जेव्हा रनवेवर पाऊल ठेवले, तेव्हा तिच्या उपस्थितीत वेगळेपणाची जाणीव आणि शांत, तरीही प्रभावी सामर्थ्य जाणवले. आपल्या संयत उपस्थितीने आणि वैशिष्ट्यपूर्ण शैलीने कल्कीने संपूर्ण रनवेवर आपले वर्चस्व गाजवले आणि या सादरीकरणाला अभिजाततेची झलक दिली. या संध्याकाळचा समारोप उत्सवी आणि भव्य अंतिम सादरीकरणाने झाला, जेव्हा कल्की कोचलिनसोबत सिद्धांत चतुर्वेदी आणि अलाया एफ हे देखील रनवेवर अवतरले आणि तिन्ही ब्रँड ॲम्बेसेडर्स एकाच मंचावर एकत्र आले. या त्रिकुटाने अत्यंत चैतन्यमय आणि ऊर्जेने भारलेल्या क्षणी शोची सांगता केली. हा क्षण केवळ शोचा शेवट वाटला नाही, तर तो फॅशन, व्यक्तिमत्त्व आणि 'मॅक्स'च्या भावनेचा एक भव्य उत्सवच भासला. या प्रदर्शनाच्या केंद्रस्थानी 'अनसिरियस एव्हरीथिंग' ही संकल्पना होती. विचारपूर्वक केलेली कारागिरी आणि फॅशनकडे पाहण्याचा खेळकर व निखळ दृष्टिकोन यांचा सुरेख मेळ या संकल्पनेत दिसून आला. हा संग्रह 'अर्बन' , 'स्पोर्ट्स कोर' आणि 'कोर कॅज्युअल' अशा तीन प्रमुख शैलींत सादर करण्यात आला होता, जो आधुनिक वेशभूषेतील सहजसुंदर आणि अभिव्यक्तिशील शैलीचे प्रतिबिंब आहे. अर्बन विभागाने महिलांसाठी सिट्रस प्रिंट्स, क्रोशे टेक्सचर्स आणि रिलॅक्स्ड को-ऑर्ड्स, तसेच पुरुषांसाठी लेमन प्रिंट्स, विंटेज फ्लोरल आणि हलक्या उन्हाळी सिल्हूट्स सादर करून उन्हाळ्याचा आल्हाददायक माहोल निर्माण केला.तर स्पोर्ट्स कोअर विभागाने महिलांसाठी क्रॉप्ड फिट्स, ट्यूब टॉप्स आणि ओव्हरसाईज्ड टीजच्या माध्यमातून उत्साही ॲथलिशर शैली सादर केली; तसेच मेन्सवेअरमध्ये पोलो, टीज आणि शॉर्ट्सवर बास्केटबॉल-प्रेरित ग्राफिक्स पाहायला मिळाले.त्यानंतर सादरीकरण कोर कॅज्युअलकडे वळले, जिथे हवेशीर कॉटन सिल्हूट्स, शांत निळे आणि क्रिस्प पांढरे रंग, तसेच रिलॅक्स्ड टेलरिंगने परिष्कृत दैनंदिन पेहराव अधोरेखित केला. या सादरीकरणाचा समारोप इंडो-वेस्टर्न फ्युजन क्षणाने झाला, जिथे इंडिगो आणि मातीच्या रंगांतील ओव्हरसाईज्ड बॉटनिकल मोटिफ्सनी रनवेला काव्यात्मक समारोपाची छटा दिली आणि बहुउपयोगिता, व्यक्तिमत्त्व व सहज शैलीवर आधारित पेहरावाच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. वीस वर्षांची यशस्वी वाटचाल अविरत सुरू भारतात वीस वर्षे पूर्ण करणे हा 'मॅक्स फॅशन'साठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. भारत हा नेहमीच चैतन्यमय आणि अभिव्यक्तीपूर्ण फॅशन बाजार राहिला आहे. गेल्या काही वर्षांत आम्ही अशा एका पिढीसोबत वाटचाल केली आहेआणि त्यांच्यासोबतच आमचीही वाढ झाली आहेजी स्टाईलकडे आत्मविश्वास, स्वतःचे वेगळेपण आणि उत्साही दृष्टिकोनातून पाहते.

या यशस्वी वाटचालीचा उत्सव हा 'लॅक्मे फॅशन वीक'मध्ये रॅम्प सादरीकरणाद्वारे साजरा करणे हा आम्हाला सर्वात योग्य मार्ग वाटला. सुमित चंदना, मुख्य कार्यकारी अधिकारी, मॅक्स फॅशन शिवाय रॅम्पपलीकडे जाऊन, 'मॅक्स'ने लॅक्मे फॅशन वीकच्या चारही दिवसांत एक विशेष 'ब्रँड अनुभव क्षेत्र' उभारले होते. या ब्रँड अनुभव क्षेत्रामध्ये संपादक, क्रिएटर्स आणि फॅशन क्षेत्रातील जाणकारांना मॅक्सच्या कलेक्शनचा अनुभव घेता आला तसेच ब्रँडचा दृष्टिकोनही समजून घेता आला. हा केवळ एक शो नव्हता; तर ते एक ठाम विधान होते. 'मॅक्स'ने भारताच्या फॅशन संस्कृतीसोबत वाटचाल करत आपली वीस वर्षे पूर्ण केली आहेत; आणि लॅक्मेच्या रॅम्पवरील सादरीकरण पाहता, पुढील वीस वर्षे त्याहूनही अधिक रंजक असणार आहेत.

# भारताच्या टेक एसएमई केंद्रस्थानी; नॅसकॉम तर्फे एसएमई इन्स्पायर अवॉर्ड्स २०२६ मध्ये नवोपक्रम आणि नवोन्मेषकांचा सन्मान

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- भारताचा तंत्रज्ञानाधारित एसएमई क्षेत्र सध्या मुळे होणारे बदल, आर्थिक परिस्थितीतील बदल आणि वेगाने बदलणारी जागतिक मागणी यामुळे एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे आता नव्याने सुरुवात करणे, पुन्हा उभारणी करणे आणि पुढे नेतृत्व करणे ही गरज खूपच तातडीची झाली आहे. या पार्श्वभूमीवर नॅसकॉम ने आज एसएमई इन्स्पायर अवॉर्ड्स २०२६ च्या चौथ्या आवृत्तीतील विजेत्यांची घोषणा केली, ज्यामध्ये भारताच्या वेगाने विकसित होत असलेल्या तंत्रज्ञान एसएमई इकोसिस्टममधील उत्कृष्टता, नवोन्मेष आणि लवचिकतेचा गौरव करण्यात आला. हे पुरस्कार अशा संस्थांना ओळख देतात ज्या केवळ व्यवसायवाढ साध्य करत नाहीत, तर विविध उद्योगांमध्ये तंत्रज्ञानाधारित परिवर्तनाचे भविष्य घडवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. बिझनेस एक्सलन्स, टेक्नॉलॉजी एक्सलन्स आणि स्पेशल रिकग्निशन अशा तीन प्रमुख श्रेणींमध्ये विभागलेले हे पुरस्कार संस्थेच्या यशाच्या विविध पैलूंना अधोरेखित करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. याशिवाय, उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील एसएमईसाठी दोन विशेष पुरस्कारही सुरू करण्यात आले असून, तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीतील त्यांच्या प्रयत्नांना आणि यशाला मान्यता देण्यात आली आहे. नॅसकॉम एसएमई इन्स्पायर अवॉर्ड्स २०२६ मध्ये २५ उत्कृष्ट संस्थांचा सन्मान करण्यात आला, ज्यातून भारताच्या टेक एसएमई क्षेत्रातील सखोलता आणि विविधता अधोरेखित झाली. विजेत्यांमध्ये आरएस सॉफ्टवेअर, सम्यक इन्फोटेक, माइंडमॅप डिजिटल, नवसॉफ्ट, फाईव्हस डिजिटल, सीएसएम टेक्नॉलॉजीज, देसीक्रू, फिड्रॉक्स टेक्नॉलॉजीज, हूनारटेक, फिंगेंट ग्लोबल सोल्युशन्स, झेनोव्हेक्स टेक्नॉलॉजीज आणि सॉफ्टडेल यांचा समावेश असून, वित्तीय सेवा, उत्पादन, हेल्थकेअर, रिटेल, गव्हटेक, एआय नवोन्मेष, लोकव्यवस्थापन आणि ग्रोथ लीडरशिप अशा विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच रायझिंग स्टार्स पुरस्कारांतर्गत वज्र ग्लोबल, हाल्टडोस, एमटच लॅब्स, व्हेंचरसाथी, क्लियरट्रस्ट आणि ग्रेडियंट एम आयटी कन्सल्टिंग अँड सर्व्हिसेस यांचा समावेश असून, वर्कफोर्स रेडीनेस, उदयोन्मुख तंत्रज्ञान, डिजिटल परिवर्तन, ग्राहकांवरील प्रभाव आणि लवचिकता या क्षेत्रांतील त्यांच्या योगदानासाठी त्यांना गौरविण्यात आले. स्पेशल अवॉर्ड्स अंतर्गत इंटेग्रा, आयलेन्सिस, व्हीडार्ट इंक., रेडियन सॉफ्टवेअर आणि सेमेको प्लास्ट यांचा सन्मान करण्यात आला. तसेच अद्यासा महापात्रा आणि गायत्री ठक्कर यांना वैयक्तिक सन्मान प्रदान करण्यात आले. डेटा प्रायव्हसी, सीएसआर, ईएसजी, जागतिक विस्तार, तंत्रज्ञान स्वीकार, उद्योजकता आणि नेतृत्व या क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेण्यात आली. या सर्वांमधून नवोन्मेष, अनुकूलता आणि जागतिक स्पर्धात्मकतेत नवे मापदंड निर्माण करणाऱ्या एसएमई चे योगदान स्पष्टपणे दिसून येते.

नॅस्कॉम चे व्हाइस प्रेसिडेंट आणि हेड मेंबरशिप अँड आऊटरीच, श्रीकांत श्रीनिवासन, म्हणाले, ''भारताचे तंत्रज्ञानाधारित एसएमई सध्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर आहेत. ते सक्रियपणे त्यांच्या वाढीच्या मॉडेल्सची पुनर्बांधणी करत आहेत, क्षमता नव्याने उभारात आहेत आणि एआय-आधारित जगासाठी टॅलेंट स्ट्रॅटेजीज पुन्हा परिभाषित करत आहेत. एसएमई इन्स्पायर अवॉर्ड्स २०२६ या परिवर्तनाचे नेतृत्व आत्मविश्वासाने आणि स्पष्ट दृष्टिकोनासह करणाऱ्या संस्थांचा गौरव करतात. हे उद्योग त्यांच्या कार्यप्रणालीच्या केंद्रस्थानी बुद्धिमत्ता समाविष्ट करत आहेत आणि केवळ सेवा प्रदाते म्हणून नव्हे, तर जागतिक ग्राहकांना विश्वासाने अवलंबून राहता येतील असे धोरणात्मक भागीदार बनत आहेत.

# भागवत कथा अमृतमय: पंचप्राणांचे गूढ आणि मानव जीवनाचा उद्धार करते; प. पू. रमेश भाई ओझा यांचे प्रतिपादन







* आत्ताच एक्सप्रेस
**गोपालराव सरनायक**

**हिंगोली–** भागवत कथा ही केवळ धार्मिक ग्रंथ नसून ती जीवनाला दिशा देणारे अमृत आहे, असे प्रतिपादन प. पू. रमेश भाई ओझा यांनी बुधवारी कथा समाप्ती वेळी आपल्या प्रवचनात केले.

येथील रामलीला मैदानावर गजराज बाल गणेश मंडळाच्या पुढाकारातून बुधवारी प. पू. भाईश्री रमेश भाई ओझा यांचे श्रीमद भागवथा समारोप प्रसंगी बोलत होते. यावेळी रमेशचंद्र अग्रवाल, निकुंज अग्रवाल, कालवाडिया परिवार, कैलास चंद्र खंडेलवाल यांच्या वतीने ग्रंथाची पूजा करून भागवत कथेला सुरुवात करण्यात आली.

भाईश्री बोलताना म्हणाले, भागवत श्रवण केल्याने मनुष्याचे जीवन पवित्र होत असून त्याचा आध्यात्मिक उद्धार होतो, असे त्यांनी सांगितले.

प्रवचना दरम्यान मानव शरीरातील पंचप्राण आणि पंच उपप्राण यांचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे स्पष्ट करण्यात आले. शरीरात प्राणशक्ती नसल्यास कोणतीही हालचाल अशक्य आहे. हीच प्राणशक्ती सर्व सजीवांमध्ये यात कीटक, पशु, पक्षी, समान स्वरूपात अस्तित्वात आहे. मात्र, प्राणशक्ती कमी होत गेल्यास शरीराची ताकदही क्षीण होत जाते, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे भाईश्री म्हणाले, पंचप्राणांचे कार्य वेगवेगळे असून ते शरीराच्या विविध क्रियांना नियंत्रित करतात. त्यामध्ये रक्त शुद्ध करून ते संपूर्ण शरीरात पोहोचवण्याचे कार्यही समाविष्ट आहे.

विशेषतः हृदयासारखे महत्त्वाचे अवयव जन्मापासून अखंड कार्यरत असतात, ही परमेश्वराच्या अद्भुत रचनेची साक्ष असल्याचे नमूद करण्यात आले. यावेळी आधुनिक विज्ञानाशी तुलना करताना, परमेश्वराची सृष्टी आणि रोबोटिक तंत्रज्ञान यामध्ये मोठा फरक आहे, असे सांगण्यात आले. रोबोट हा यांत्रिक पद्धतीने तयार केलेला असून त्याचे हसणे–रडणे हे कृत्रिम असते. परंतु मानवातील भावना, चेतना आणि प्राणशक्ती ही दैवी देणगी आहे, जी कोणत्याही यंत्रात निर्माण करता येत नाही.

तसेच, मानव शरीर आणि देवत्व यातील भेद स्पष्ट करताना सांगण्यात आले की, मानव शरीर हे लोखंडासारखे आहे तर देवत्व हे चांदीसारखे तेजस्वी आहे. पारस मणीच्या स्पर्शाने जसे लोखंडाचे सोने होते, तसेच भागवत कथा आणि परमेश्वर भक्तीमुळे मानवाचे जीवन परिवर्तन घडते, असा सुंदर दृष्टांत देण्यात आला. या प्रवचनातून भाविकांना जीवनातील आध्यात्मिक मूल्यांची जाणीव करून देत भागवत श्रवण, नामस्मरण आणि सदाचार यांचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.

**कार्यकर्त्यांनी काढला सामूहिक फोटो**

मागील पंधरा ते विस दिवसापासून गजराज बाल गणेश मंडळासह इतर मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कथा संपल्यानंतर भाईश्री सोबत सामूहिक फोटो घेतला.

## विविध मागण्यासाठी शेतकऱ्यांनी टायर जाळत कनेरगाव जिंतूर रस्तावर आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस**



**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यात मागील वर्षी शेतकऱ्यांचे अतिवृष्टीच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर सोयाबीन व इतर पिकांचे नुकसान झाले यानंतर राज्य सरकारने मोठ पॅकेज जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला मात्र राज्य सरकारने घोषित केलेला विमा अद्यापही शेतकऱ्यांना मिळाला नसल्याने शेतकरी रस्त्यावर उतरले होते

यासह हिंगोली जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी अवैध गौण खनिज उत्खनन झाल्यानंतर सुद्धा जिल्हाधिकारी यांनी गौण खनिज नियमानुसार भरणा केल्या नसल्याचे तक्रार शेतकऱ्यांनी केली यामध्ये अनेक कंपन्यांनी जिल्ह्यामध्ये अवैध उत्खनन केले व या उत्खननाला जिल्हा गौणखनिज अधिकारी व उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली

सेनगाव तालुक्यामध्ये आज जवळपास सहा महिन्यापासून कुठलाही रोजगार हमीचे कामे चालू नसल्याने शेतकरी यांनी विहीर गायगोठे व इतर रोजगार हमीची कामे कधी करायचे असा प्रश्न शेतकऱ्यांनी विचार केला

हिंगोली जिल्ह्यांमध्ये सत्तरच्या वर बोगस जैविक पेस्टिसाइड कंपन्या कार्यरत असून यावर जिल्हा कृषी अधीक्षक चकार शब्दही बोलायला तयार नाहीत तसेच कारवाई करायला तयार नाहीत या अनुषंगाने क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी तथा शेतकरी यांनी दि.२४०३२०२६ मंगळवार रोजी सकाळी ११. ३० कनेरगाव जिंतूर महामार्ग हाताळा फाटी या ठिकाणी अडवून टायर जाळले व जिल्हा प्रशासनाचा निषेध व्यक्त केला यावेळी प्रशासनाच्या वतीने मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता

यामध्ये गजानन कावरखे (मराठवाडा अध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना),नामदेव पतंगे, सतीश इडोळे,प्रवीण मते,राहुल कावरखे,बबन कावरखे,अशोक कावरखे,दीपक सावके, शांतिराम सावके.यासह मोठ्या संख्येने शेतकरी, आणि सर्व विभागाचे अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

## शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य पुरस्कारार्थींच्या सत्कारासह रंगले काव्य संमेलन

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ हिंगोली संचलित शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले समाजसेवा पुरस्काराच्या मानकरी उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या, जिजाऊ ब्रिगेड राष्ट्रीय संघटक श्रीमती सुनिता मुळे, सुप्रसिद्ध हिंदी कवयित्री, हिंदी काव्य पुरस्कार विजेत्या सुमन गोपाल दुबे ''स्वामिनी''यांच्या सत्कारासह हिंगोली येथील सुप्रसिद्ध कवी कवयित्री यांचे काव्य संमेलन संपन्न झाले. या समारंभाच्या अध्यक्षा श्री

शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सौ. मंदाताई पवार, यावेळी प्रमुख उपस्थिती माजी शिक्षणाधिकारी संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव पवार, मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली शाखेचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर, ''थवा'' प्रकाशनचे संचालक गोडाती काळे, साहित्यिक कलानंद जाधव, रतन आडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामदास मुक्ते, उपप्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर, कवयित्री संगीता चौधरी, पारिजात देशमुख, विजया पतंगे, राधिका देशमुख, अश्विनी देशमुख, कवी रघुवीर पतंगे, काळे, यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

समारंभात मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त श्रीमती सुनिता मुळे, हिंदी साहित्य पुरस्कार प्राप्त सुमन गोपाल दुबे ''स्वामिनी'' यांचा दिव्यभव्य सत्कार श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ हिंगोली यांच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली शाखेचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर, माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, सौ मंदाताई पवार, श्रीमती सुनिताताई मुळे, साहित्यिक सुमन गोपाल दुबे स्वामिनी, यांची मार्गदर्शनपर भाषणे संपन्न झाली.

यानंतर मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली शाखेच्या वतीने नामवंत कवीचे काव्यसंमेलन संपन्न झाले. यात हिंगोली येथील सुप्रसिद्ध कवी कवयित्रींनी बहुविध रसातील काव्याचे अप्रतिम सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले .आभार प्राचार्य डॉ. रामदास मुक्ते यांनी मानले. सूत्रसंचालन साहित्यिक प्रा. धाराशिव वैजनाथराव शिराळे यांनी केले.

या समारंभासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. काव्याच्या सादरीकरणासह मान्यवरांचा सत्कार निश्चितच मार्गदर्शनासह प्रेरणादायी असाच संपन्न झाला.

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

निष्काम जन सेवाये समर्पिता

**सर्वसाधारण सभा**
**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (०३)**

**दिनांकः १८.०३.२०२६**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण–२ मधील नियम क्र. १ (क) अन्वये मा. महापौर श्री.महापैर समिर सुभाष राजुरकर यांनी शुक्रवार दिनांक २७.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेतील प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजित केली आहे.

**मा. आयुक्तांकडून आलेले प्रस्ताव**

**विषय क्रमांक ०९:**
श्री स्वामी विवेकानंद उद्यान टि.व्ही. लळींशृिीरींसेंटर मजनुहिल येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे.

**विषय क्रमांक १०:**
झोन क्र १ ते १० शहरी भागात रस्ता/पॅचवर्कसाठी पॉटहोल पॅचिंग मशिनकरिता Bitumen Emulsion grade-1 HDPE कोल्ड इमल्शन व ६ ।। आकाराच्या aggregates खरेदीसाठी वार्षिक दर करार करून एजन्सी नियुक्त करणे.

**स.पालिका सदस्याकडुन आलेले प्रस्ताव**

**विषय क्रमांक ११:**
प्रभाग क्र. २० अंतर्गत हॉटेल अमरप्रित ते शहानुरमियाँ दर्गा चौक रस्त्यावर जयविश्वभारती कॉलनी येथे श्री. सावरकर यांचा पुतळा उभारणे.
(सुचक: श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे;
अनुमोदक:– श्री. जालिंदर महादेव शेंडगे, श्रीमती अनिता किशोर मानकापे, श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ

**विषय क्रमांक १२:**
देवळाई गट नं. ३ विनायकरावजी हिवाळे पाटील यांच्या घरासमोरील चौकास छत्रपती शिवाजी महाराज चौक नाव देणे.
(सुचक: श्री. अप्पासाहेब विनायक हिवाळे) अनुमोदक: श्रीमती सविता रत्नाकर कुलकर्णी ,श्री पदमसिंह काशिनाथ राजपूत)

**विषय क्रमांक १३:**
बीड बायपास रोडवरील छत्रपती संभाजी महाराज चौक ते हिमालया रेसीडेन्सी खडी रोडवरील गोविन्दम हाईट बिल्डींग समोरील चौकास जिजाऊ चौक नाव देणे.
(सुचक: श्री. अप्पासाहेब विनायक हिवाळे; अनुमोदक: श्रीमती सविता रत्नाकर कुलकर्णी ,श्री पदमसिंह काशिनाथ राजपूत)

**विषय क्रमांक १४:**
सोलापूर ते धुळे राष्ट्रीय महामार्गातील नक्षत्रवाडी येथील उड्डाणपुलाखालील चौकास श्री. विश्वकर्मा चौक नाव देणे.
(सुचक: श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले)
अनुमोदक:– श्रीमती श्वेता सुमित त्रिवेदी, श्री. सिध्दांत संजय सिरसाट, श्रीमती सिमा सिध्दार्थ

**विषय क्रमांक १५:**
समर्थनगर येथील श्री. गणेश सभा, श्री. वरद गणेश मंदिर या मंदिराचा महाराष्ट्र शासनाच्या क वर्ग दर्जा असलेल्या तीर्थक्षेत्रात समावेश करणे.
सुचक:– श्रीमती साळवे सीमा सिध्दार्थ, श्री. अनिल श्रीकिशन मकरिये अनुमोदक:– श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे, श्री.ऋषिकेश प्रदीप जैस्वाल

**विषय क्रमांक १६:**
श्री. समर्थ रामदास स्वामी चॅरिटेबल ट्रस्ट, श्री. महापैर समर्थ राम मंदिर, समर्थनगर या मंदिराचा महाराष्ट्र शासनाच्या क वर्ग दर्जा असलेल्या तीर्थक्षेत्रात समावेश करणे.
सुचकः– श्रीमती साळवे सीमा सिध्दार्थ. श्री. अनिल श्रीकिशन मकरिये
अनुमोदक:– श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे, श्री.ऋषिकेश प्रदीप जैस्वाल

**पुरवणी विषय पत्रिकाः**

**विषय क्रमांक १७**
शहराचे नाव छत्रपती संभाजीनगर केल्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री श्री. एकनाथरावजी शिंदे व तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे अभिनंदन करणे.
(सुचक: श्री. जंजाळ राजेंद्र हिम्मतराव) अनुमोदक:– श्री. किशोर बाबुराव नागरे

विषय क्रमांक १८:
पडेगाव मिटमिटा येथे उभारण्यात येत असलेल्या सफारी पार्कला छत्रपती संभाजीराजे भोसले सफारी पार्क असे नाव देणे.
(सुचक: श्री. जंजाळ राजेंद्र हिम्मतराव) अनुमोदक:– श्री. किशोर बाबुराव नागरे

विषय क्रमांक १९:
प्रभाग क्र. २७ अंतर्गत शिवाजीनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणे.
(सुचक: श्री. रेणुकादास (राजु) अनुमोदक:– श्री. गोविंद परशुराम केंद्रे, श्रीमती सोळंके सुनिता संजय, श्रीमती दया कैलास गायकवाड

विषय क्रमांक २०:
पडेगाव येथील गट क्र. ७० मधील ५ एकर गायरान जमीन स्मशानभूमीसाठी मागणी करणे व विकासासाठी तरतूद करणे.
(सुचक: श्री. गणेश कौतिकराव लोखंडे) अनुमोदकः –श्रीमती सावित्रीबाई हिरालाल वाणी

विषय क्रमांक २१:
डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भडकल गेट), छत्रपती संभाजी महाराज स्मारक (टी.व्ही. सेंटर) आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारकाचे काम तात्काळ पूर्ण करणे.
(सुचक: श्री. अमित सुधाकर भुईगळ) अनुमोदक:– श्री. अफसर खान यासीन खान

**स्वाक्षरीत/-**
**नंदकिशोर भोंबे**
**महापालिका सचिव,**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

## थोडक्यात

### ऑडिटर्स असोसिएशनचे राज्यस्तरीय अधिवेशन

**यवतमाळ :** महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह डिपार्टमेंट ऑडिटर्स असोसिएशन नागपूरच्या वतीने राज्यस्तरीय अधिवेशन शनिवारी (२८ मार्च) नेर येथे आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता या अधिवेशनाचे उद्घाटन अमरावती विभागीय सहकारी संस्था सहनिबंधक सुदाम रोडगे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री संजय राठोड उपस्थित राहतील. अधिवेशनात सहकार क्षेत्रातील बदलते धोरण, ऑडिट प्रक्रियेतील सुधारणा, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेसंदर्भात चर्चा व मार्गदर्शन होणार आहे. संघटनेची नवीन कार्यकारिणीही यावेळी जाहीर केली जाणार आहे. सहकार क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, तज्ज्ञ आणि राज्यभरातील लेखापरीक्षक, कर्मचारी यावेळी उपस्थित राहतील. या अधिवेशनामुळे ऑडिट प्रणाली अधिक बळकट होण्यास मोठी मदत होणार असल्याचे राज्य संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी सांगितले, असे प्रसिद्धी प्रमुख एम. एल. तरोणे यांनी कळविले आहे.

### विहाण कुमेरिया चित्रकलेत अव्वल

यवतमाळ : येथील विश्वभारती स्कुलचा विहाण कुमेरिया याने मास्टर स्ट्रोक ड्रॉईंग स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावित जिल्हा गट अ स्पर्धेकरिता निवड झाली. शाळा अध्यक्ष ज्वालासिंग ठाकूर, उपाध्यक्ष जालमसिंग ठाकूर, सचिव हिरासिंग चव्हाण, मुख्याध्यापिका दीप्ती सुरसवाल, ज्योती परमार, राहुल गुल्हाणे यांनी विहाणचे कौतुक केले.

# संपादकांशी गैरवर्तन करणाऱ्या 'त्या' पोलिस अधिकाऱ्यावर कारवाई करा !

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**यवतमाळ :** स्थानिक दैनिक 'लोकसूत्र'चे कार्यकारी संपादक केशव सवळकर यांच्यासोबत अत्यंत अर्वाच्य भाषेत गैरवर्तन करणाऱ्या एपीआय पंकज दाभाडे यांच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आज (दि. २५) 'महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघटना, नागपूर, शाखा यवतमाळच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.




सोमवारी (दि.२३) दारव्हा कारंजा मार्गावरील भांडेगाव टोल नाका बंद करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाच्या वृत्त संकलनासाठी जिल्ह्यातील विविध माध्यमांचे प्रतिनिधी घटनास्थळी उपस्थित होते. पोलिसांनी सुरक्षेसाठी बॅरिकेट्स लावले होते, मात्र पत्रकारांनी आपली ओळख पटवून दिल्यानंतर त्यांना टोल नाक्यापर्यंत जाण्याची परवानगी देण्यात आली होती. आंदोलनस्थळी परिस्थिती शांत असतानाही कर्तव्यावर तैनात असलेल्या एपीआय पंकज दाभाडे यांनी अचानक आक्रमक पवित्रा घेतला.

त्यांनी तेथील नागरिकांना आणि पत्रकारांना शिवीगाळ करत हाकलून देण्यास सुरुवात केली. यावेळी संपादक केशव सवळकर यांनी आपली ओळख देत ओळखपत्र दाखवून आपण पत्रकार असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, दाभाडे यांनी त्यांचा हात जोरात पकडून त्यांना धक्काबुक्की केली आणि अत्यंत घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करत 'शहाणपणा शिकवू नकोस' असे म्हणून अपमानित केले. निवेदनात म्हटले आहे की, घटनास्थळी इतरही वरिष्ठ पोलिस अधिकारी हजर होते, परंतु केवळ दाभाडे यांनीच आपला 'सिंघम' अवतार दाखवण्यासाठी एका प्रतिष्ठित पत्रकाराचा सार्वजनिक ठिकाणी अपमान केला. यामुळेसंविधानाने पत्रकारांना दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे हनन झाले आहे. 'पत्रकार हे कधीच गर्दीचा हिस्सा नसतात' असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले असतानाही पोलिस आणि माध्यमांमधील सुसंवादाला तडा गेला आहे. जरी एसडीपीओ डॉ. सिद्धेश्वर भोरे आणि ठाणेदार श्री. मुळे यांनी प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला, तरी दाभाडे यांच्या चेहऱ्यावर आपल्या या कृत्याबद्दल कोणताही पश्चात्ताप नव्हता. पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत राऊत आणि सचिव अमोल ढोणे यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले.

एपीआय दाभाडे यांच्यावर सेवाशिस्त भंग आणि मानहानीप्रकरणी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती विशेष पोलिस महानिरीक्षक (अमरावती), लोकायुक्त आणि पोलिस अधीक्षकांनाही पाठविण्यात आल्या आहेत. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही स्वतंत्र निवेदन पाठविण्यात आले असून दाभाडे यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

# अफवांचा स्फोट की इंधन संकट? उमरखेडमध्ये पेट्रोल-गॅससाठी झुंबड!

● **युद्धाच्या चर्चांनी पेटवली भीती; पंपांवर लांबच लांब रांगा, नागरिकांमध्ये संभ्रम**

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**बाबा खान लाला**

उमरखेड :- इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाईची भीती पसरताच उमरखेड शहरासह तालुक्यात अभूतपूर्व गर्दी उसळली. पेट्रोल पंप आणि गॅस एजन्सीसमोर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्याने नागरिकांमध्ये भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अफवांचा वेग इतका प्रचंड होता की, ग्रामीण भागापासून शहरापर्यंत सर्वत्र वाहनधारकांनी पेट्रोल पंपांकडे धाव घेतली. "उद्या पेट्रोल मिळणार नाही", "दर वाढणार" अशा चर्चांनी लोकांमध्ये घबराट निर्माण केली. परिणामी मुळावा, ढाणकी, विडुळसह



तालुक्यातील अनेक ठिकाणी रस्त्यांवर वाहनांच्या रांगांनी वाहतूकही विस्कळीत झाली.

गर्दी पाहून आणखी नागरिकांनी पेट्रोल भरण्याचा निर्णय घेतल्याने परिस्थिती अधिकच चिघळली. सलग दुसऱ्या दिवशीही ग्रामीण भागात हेच चित्र कायम असून, अनेकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे.

**पहाटेपासून रांगा, तरीही निराशा हाती**

गॅस एजन्सीसमोरही ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. बुकिंग करून १०-१२ दिवस उलटूनही गॅस मिळत नसल्याने ग्राहक संतप्त झाले आहेत. "आज तरी सिलिंडर मिळेल" या आशेने नागरिक वारंवार एजन्सीकडे फेऱ्या मारत आहेत; मात्र शेवटी रिकाम्या हाताने परतण्याची वेळ येत आहे. पुरवठा न झाल्यामुळे ग्राहक व कर्मचाऱ्यांमध्ये वादाचे प्रसंगही घडत आहेत.

> ■ "अफवांमुळेच नागरिक भावनिक होऊन गर्दी करत आहेत. प्रत्यक्षात पुरवठा सुरू आहे."
> **– कृष्णा पाटील देवसरकर, पेट्रोल पंप संचालक**

> ■ "इंधन पुरवठा सुरळीत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये व अनावश्यक गर्दी टाळावी,"
> **अमोल महाजन नायब तहसीलदार उमरखेड**

**"तेल आहे, पण व्यवहारात अडथळे"**

काही पंपचालकांच्या माहितीनुसार, प्रत्यक्षात पेट्रोल-डिझेल उपलब्ध आहे; मात्र कंपन्यांनी क्रेडिट सुविधा बंद केल्याने आगाऊ पैसे भरून टँकर मागवावे लागत आहेत. त्यामुळे पुरवठ्यात तात्पुरते अडथळे निर्माण होत आहेत, पण टंचाई नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# एलसीबीची दमदार कारवाई! उमरखेड उपविभागातील गुन्हे उघड प्रकरणी यवतमाळ एलसीबी टीमचा सन्मान

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**बाबा खान लाला**

उमरखेड : उमरखेड उपविभागात वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालत यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करत तब्बल 13 मोटारसायकली आणि 8 कृषीपंप चोरी प्रकरणांचा छडा लावला आहे. या प्रकरणात आरोपींना अटक करून गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळाल्याने संपूर्ण विभागात एलसीबीच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

ही कारवाई केवळ तपासापुरती मर्यादित न राहता, गुन्हेगारांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून, तांत्रिक माहिती आणि गुप्त सूत्रांच्या मदतीने पार पडली. चोरीच्या वाढत्या घटनांमुळे त्रस्त असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.



या उल्लेखनीय आणि निपुण कामगिरीची दखल घेत अमरावती विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक पोकळे यांनी यवतमाळ एलसीबी टीमचा विशेष सन्मान एका कार्यक्रमात केला. यावेळी संपूर्ण पथकाच्या चिकाटी, समन्वय आणि कर्तव्यदक्षतेचे कौतुक करण्यात आले.

एलसीबी प्रमुख पोलीस निरीक्षक सतीश चवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक धीरज बांडे, पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे, तसेच

मुन्ना आडे, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, सुनील पंडागळे, रविंद्र शिरामे, राजेश जाधव यांचा यामध्ये समावेश आहे.

या सर्वांनी समन्वय साधत, अचूक नियोजन आणि सतत पाठपुरावा करून गुन्ह्यांचा उलगडा केला. त्यांच्या या कामगिरीमुळे पोलीस दलाची प्रतिमा अधिक मजबूत झाली आहे.

दरम्यान, या कारवाईमुळे चोरीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असून, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

# लोकनेते हरपले, पण आठवणी जाग्या!

● **हिवरी येथे स्वर्गीय विश्वनाथराव मोहितकर यांचा 'डायका' कार्यक्रम संपन्न; नातेवाईकांचे डोळे पाणावले**

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**हिवारी :** समाजाच्या सुख-दुखात खंबीरपणे उभे राहणारे व्यक्तिमत्व, आदर्श शेतकरी आणि मुरब्बी राजकारणी स्वर्गीय विश्वनाथराव मोहितकर यांच्या निधनाला एक वर्ष पूर्ण होत असतानाच, त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला 'डायका' हा कार्यक्रम बुधवारी अत्यंत भावूक वातावरणात संपन्न झाला. हिवारी येथील त्यांच्या निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमाला नातेवाईक आणि ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती.

स्वर्गीय विश्वनाथराव मोहितकर हे केवळ एक सदन शेतकरी नव्हते, तर ते एक प्रगल्भ विचारांचे



समाजसेवक होते. राजकारणात सक्रिय असताना त्यांनी विविध पदांच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडली. अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख संपूर्ण तालुक्यात होती. गेल्या वर्षी त्यांच्या निधनाने मोहितकर परिवारासह संपूर्ण मारेगाव तालुक्यावर शोककळा पसरली होती. आज त्यांच्या पहिल्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

या विशेष कार्यक्रमात उपस्थित गायकांनी जेव्हा विश्वनाथरावजींच्या जीवनप्रवासावर आणि त्यांच्या समाजकार्यावर आधारित गीते व आठवणी सादर केल्या, तेव्हा उपस्थित असलेल्या प्रत्येकाचे डोळे पाणावले. त्यांच्या कष्टाची आणि संघर्षाची गाथा ऐकून संपूर्ण वातावरण गहिवरून गेले होते. "एक सच्चा लोकनेता कसा असावा," याचे जिवंत उदाहरण म्हणजे विश्वनाथराव होते, अशा भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केल्या.

या प्रसंगी विश्वनाथराव मोहितकर यांचे सुपुत्र मोहन मोहितकर, पत्नी कलावती मोहितकर, सुना, नातवंडे आणि संपूर्ण मोहितकर परिवार उपस्थित होता. आपल्या मार्गदर्शकाची उणीव भासत असतानाच, त्यांनी सामाजिक वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी बोलून दाखवला. या कार्यक्रमाला केवळ नातेवाईकच नव्हे, तर तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनीही हजेरी लावून आदरांजली वाहिली.

# प्रा . ज्योती काळबांडे यांना व्हिएतनामध्ये आंतरराष्ट्रीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**बाबा खान लाला**

उमरखेड : परिसरातील मिलिंद महाविद्यालय मुळावा येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा . ज्योती काळबांडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक , शैक्षणिक कार्याबद्दल आंतरराष्ट्रीय बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला . येथील अ - 25 लक्झरी हॉटेलात आयोजित भव्य सभागृहात जागतीक आंबेडकरी साहित्य महामंडळाच्या वतीने आयोजीत सहाव्या विश्व आंबेडकरी साहित्य संमेलनात अध्यक्ष सुप्रसिद्ध नाटककार डॉ . सुनील रामटेके संमेलनाचे उद्धाटक जेष्ठ कथाकार प्राचार्य डॉ नागनाथ पाटील,स्वागताध्यक्ष जागतिक समाजशास्त्रज्ञ डॉ . जगन




कराडे,महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे , संस्थेचे उपाध्यक्ष तथा संमेलनाचे संयोजक प्रोफेसर डॉ . अनिल काळबांडे , प्राचार्य डॉ . राहुल मस्के , डॉ . राजेश गायकवाड , प्राचार्य डॉ . वैशाली प्रधान, महामंडळाचे कायदेविषय सल्लागार एडवोकेट भूपेश पाटील , डॉ गुरुस्वामी,यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह , प्रमाणपत्र देऊन हा पुरस्कार देण्यात आला . प्रा . ज्योती काळबांडे गेल्या 30 वर्षापासून मिलिंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाचे अध्यापन करतात त्याचबरोबर त्या विविध सामाजिक संघटनेत व शैक्षणिक कार्यात महत्वपूर्ण योगदान देतात त्यांच्या शैक्षणिक कार्यातून अनेक युवक युवतींना समोर जाण्याची प्रेरणा मिळते .त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण होते . विद्यार्थ्यांना अनेक उपक्रमातून त्या सातत्याने प्रयन्त करत असल्याने त्या विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून सुद्धा प्रसिद्धआहेत . डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित महापुरुषांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन सामाजिक वंचित घटकांना न्याय देण्याकरिता हा जागतिक पातळीवरचा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वतीने याही अगोदर दुबई , बँकॉक, थायलंड ,मलेशिया श्रीलंका या देशात संमेलने घेऊन सामाजिक कार्य करणाऱ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला होता . प्रा . ज्योती काळबांडे यांच्या यशामुळे उमरखेड तथा जिल्ह्यात साठी ही अभिमानाची बाब असल्याने त्यांचे अनेक सामाजिक शैक्षणीक तथा पत्रकार प्लँटफॉर्म वतीने अभिनंदन करण्यात आले .

# दराटी येथे 'महाराजस्व समाधान शिबिर' संपन्न

● **१५३३ प्रमाणपत्रांचे वाटप!**

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**फुलसावंगी :** उमरखेड तालुक्यातील दराटी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अत्यंत दिमाखात पार पडले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात परिसरातील अंदाजे २००० नागरिकांनी आपली उपस्थिती दर्शवली.

शिबिरासाठी यवतमाळचे उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांच्या प्रलंबित कामांचा निपटारा करण्यात आला. यामध्ये संजय गांधी निराधार योजना, रेशन कार्ड संबंधित कामे, आयुष्मान भारत कार्ड आणि आधार



सेवा केंद्र असे एकूण १५३३ प्रमाणपत्रे आणि अहवालांचे जागीच वाटप करण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी विविध विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला, राम पंडित नायब तहसीलदार, डॉ. दुबे आरोग्य अधिकारी कोरटा,रणमले साहेब दुय्यम निबंधक, डी.डी.मदने वनपरिक्षेत्र अधिकारी, जाधव साहेब कृषी सहायक, भगवान मेंडके कृषी सहायक, ए एम पातुरकर मंडळ अधिकारी, के बी भरकाडे ग्राम महसूल अधिकारी, जी एन राजणे ग्राम महसूल अधिकारी,एस पी पोहदरे ग्राम महसूल अधिकारी,एस सी वानखेडे ग्राम महसूल अधिकारी, जुमडे मंडळ अधिकारी, सुभाष आठाव मंडळ अधिकारी यांनी एकाच छताखाली शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याने दराटी आणि परिसरातील नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले.

# महावीर युवक मंडळ, जोश फाऊंडेशनची पेयजल सेवा

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**यवतमाळ :** उन्हामुळे शरीराची काहिली होत आहे. पाण्यासाठी जीव व्याकूळ होत आहे. अशा परिस्थितीत पांथस्थांना पिण्याचे पाणी मिळावे म्हणून महावीर युवक मंडळ आणि जोश फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने येथील पोस्ट ऑफिसजवळ "महावीर पाणपोई" सुरू करण्यात आली आहे.

या सेवाभावी प्रकल्पाचे उद्घाटन आमदार बाळासाहेब मांगुळकर, लोकमत यवतमाळ जिल्हा कार्यालय प्रमुख किशोर दर्डा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. याप्रसंगी भारतीय जैन संघटनेचे यवतमाळ शहर अध्यक्ष उमेश बैद, सचिव संदीप कोचर, श्याम भंसाली, जैन सेवा समितीचे अध्यक्ष महावीर भंसाली, उपाध्यक्ष विजय कोटेचा, कस्तुर सेठिया आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी किशोर दर्डा यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, जैन समाजाच्या वतीने

सातत्याने समाजहिताचे उपक्रम राबविले जातात. पेयजल सेवा हा त्यातीलच एक आहे. या प्रेरणादायी उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

जैन समाजाचे वरिष्ठ सदस्य अमरचंद गुगलिया यांनी आपल्या विचारांमध्ये सांगितले की "तहानलेल्या व्यक्तीला पाणी उपलब्ध करून देणे हे नऊ प्रकारच्या पुण्यांपैकी एक श्रेष्ठ पुण्य आहे", ज्यामुळे या सेवाकार्याचे महत्त्व स्पष्ट होते. याप्रसंगी महावीर युवक मंडळ व जोश फाऊंडेशनचे पदाधिकारी, सदस्य, आदींची उपस्थिती होती.

# आमडापूरचा सूरज झांबरे झाला एमबीबीएस

■ दै. आत्ताच एक्सप्रेस

**फुलसावंगी :** उमरखेड तालुक्यातील आमडापूर येथील सूरज कैलास झांबरे याने कठीण परिस्थितीतून मार्ग काढत एमबीबीएस पदवी मिळवून आई, वडीलाचे स्वप्न पूर्ण केले. आदिवासी कुटुंबातील पहिला डॉक्टर बनण्याचा मान त्याने मिळवला असून, मुंबईतील ग्रँड गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज (JJ हॉस्पिटल) येथून ही पदवी प्रथम श्रेणीत पूर्ण केली. जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर त्याने पहिल्याच प्रयत्नात हे यश संपादन केले. सूरज कैलास झांबरे याने आपल्या स्वप्नांना कोणत्याही सीमांमध्ये न अडकता प्रचंड मेहनतीने हे यश मिळवले. ध्येयाप्रती निष्ठा असली की यश नक्की मिळते, हे त्याने सिद्ध केले आहे. मुंबईतील प्रतिष्ठित जेजे




रुग्णालयातून एमबीबीएस पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन त्याने आपल्या गावासह समाजाचे नाव उज्ज्वल केले. दृढनिश्चय आणि योग्य संधी मिळाली तर कोणतीही समस्या मार्ग रोखू शकत नाही, हे त्याने परिसरातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवून दाखवून दिले. सूरजचा

हा शैक्षणिक संघर्ष आणि यश ग्रामीण भागातील असंख्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्याच्या या कामगिरीमुळे आमडापूर परिसरात आनंदाचे वातावरण असून, सर्वच स्तरांतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. कष्टकरी कुटुंबातील या मुलाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत डॉक्टराचा पांढरा कोट परिधान केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813